मागील ब-याच दिवसापासुन इंटरनेट द्वारे गुन्हे घडण्याचे प्रमाण नागपूर शहरात वाढले असुन यात प्रामुख्याने अश्लिल प्रोफाईल तयार करणे, क्रेडिट कार्ड चा गैर वापर करणे इत्यादी गुन्हयांचा समावेश आहे. इंटरनेट द्वारे नेमके कश्याप्रकारे गुन्हे घडु शकतात व सामान्य जनतेने या संदंर्भात कोणती काळजी घ्यावी याची माहिती होण्यासाठी जनहितार्थ जनतेत जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने नागपूर शहर पोलीसांतर्फे खालील प्रमाणे आवाहन करण्यात येत आहे. _

**अनेक ईमेल अकॉउन्ट धारकांना अनोओळखी व्यक्तीकडुन अचानकपणे खालील प्रमाणे ईमेल (Unsolicited/ spam email) येतात**

- आपणास बक्षिस लागले आहे. मोठया रक्कमेची लॉटरी लागली आहे.
- परदेशात चांगल्या नोकरीची संधी आहे.
- मोठया कंपनीत गुंतवणूक करण्याची संधी मिळाली आहे.
- आपला नातेवाईक परदेशात आजारी आहे किंवा अडचणीत आहे किंवा अपघातात मरण पावला आहे त्याला मदत करावी. असा इमेल आपल्या मित्राचा नातेवाईकाचा ईमेल हॅक करून येऊ शकतो
- दलालीमध्ये मोठा आर्थिक लाभ मिळणार आहे.
- फ्रेंडस् क्लब मेंबर नावाची नविन संस्था उघडली आहे त्यासाठी मेंबर व्हा.
- बॅक किंवा आर्थिक संस्थेचे हुबेहुब बोधचिन्ह असलेले ई-मेलमध्ये अकाउंट अपडेट करणे
- आपले बॅकेंचे खाते हे कमीशन घेऊन पैसे पाठविण्यासाठी वापरू दयावे.
- धर्मादाय संस्था आहे असे सांगून आपल्या खात्यावर दान करणा-या व्यक्ती पैसे जमा करतील त्यातली आपण २० टक्के रक्कम कमीशन म्हणून ठेवून घ्यावी व इतर रक्कम दिलेल्या खात्यात जमा करावी.
- नौकरीसाठी इतरासांठी पाठविलेल्या बायोडाटा द्वारे आपणास नौकरीचे अपॉइन्टमेन्ट लेटर देऊन वेगवेगळे चार्जेस साठी रू. ५,०००/- , १०,०००/- रक्कमेची मागणी करतील.
- परदेशातुन/ बाहेर गावावरून आमचे पैसे येणार आहे आपल्या बॅकेतील खात्याचा व ए.टी.एम. कार्ड चा वापर करून दया त्याकरिता रू. ५,०००/- तुम्हाला भाडे देऊ असे म्हणतील.
- संगणक, इलेक्ट्रानिक्स इत्यादी विषयातील मान्यता प्राप्त संस्थेचे परिक्षाकेन्द्र/ प्रमाणपत्र देतो असे सांगुन त्याची रक्कम बॅकेंत भरण्यास सांगतिल.

तसेच वेगवेगळया वेबसाईट च्या माध्यमाने विशेषताः www.orkut.com वेबसाईट वर अश्लिल प्रोफाईल तयार करून बदनामी केली जाते. या मध्ये प्रामुख्याने तरूण तरूणीच्या नावाने अश्लिल प्रोफाईल फोटोसह तयार करून त्यावर फोन नंबर दिले जातात तसेच अश्लिल संदेश पाठविले जातात. याकरिता नागपूर शहर पोलीसांकडुन सुचित करण्यात येते की, इंटरनेटचा वापर करताना काळजीपूर्वक वापर करण्यात यावा शक्यतो आपले फोटो अपलोड करू नये

**इंटरनेट द्वारे होणारी फसवणूक टाळण्यासाठी आपण खालील प्रमाणे काळजी घेणे आवश्यक आहे.**

- अनोळखी व्यक्तीकडुन आलेले अवांच्छीत (Unsolicited) ईमेल उघडू नये. यासोबतच्या अटॅचमेंट बघू नयेत यासोबत किलॉगर या सॉफ्टवेअर द्वारे अनोळखी व्यक्ती आपला पासवर्ड, बॅकेंचा पिन नंबर, क्रेडिट कार्ड नंबर, सी.व्ही. नंबर माहित करून घेऊन आपल्या खात्यातुन पैसे काढुन घेऊ शकते.

- फोन करून विशिष्ट बॅकेंच्या कस्टमर केअर मधुन बोलतो असे सांगुन आपली संपूर्ण गोपनिय माहिती सांगुन विश्वास संपादन करतात व क्रेडिट कार्ड नंबर, सी.व्ही. नंबर, पिन नंबर विचारून मंग त्या द्वारे आर्थिक व्यवहार करतात.

- आपले बॅक अकाऊंट क्रमांक, दुरध्वनी क्रमांक, पारपत्र क्रमांक, पासवर्ड हे ऑन लाईन अथवा फोन द्वारे न सांगणे किंवा माहिती न पाठविणे शक्यतो ऑन लाईन बॅकीग चा वापर करतांना घरच्या किंवा खात्रीच्या संगणकाचा वापर करावा तसेच पिन नंबर, पासवर्ड, सी.व्ही. नंबरसाठी व्हरचुयल कि बोर्डचा वापर करावा.

- प्राप्त ईमेल संदेशामध्ये दिलेल्या कोणत्याही अकॉउंट मध्ये पैसे न भरने.

- ज्यांनी चुकुन पैसे भरले असतील त्यांनी सर्व ईमेल सांभाळून ठेवावे डिलीट करू नये.

- इंग्लडची लॉटरी लागली असल्याचे भासविले असल्यास www.gamblingcommission.gov.uk, कंपनीच्या खरे पणाबद्दल खात्री करण्यासाठी www.companieshouse.gov.uk, कंपनीचा पत्ता बघण्यासाठी www.upmysreet.com.uk या वेबसाइटला भेटी दयाव्यात.

- कोणत्याही कारणाने परकीय चलनांने पैस न पाठविणे जर परदेशी पैसे पाठविले तर पैसे पाठविणा-यावर FEMA ( फॉरेन एक्सचेंज मॅनेजमेन्ट ॲक्ट) नुसार RBI guideline अनुसार कायदेशीर कार्यवाही होऊ शकते. अशा प्रकारे परकीय चलनामध्ये रक्कम भारताबाहेर पाठविण हे प्रतिबंधीत आहे.

- कोणत्याही ईमेल मधील लिंकला क्लिककरून कोणत्याही वेबसाईटवर जाऊ नये. वेबसाईट उघडतांना ॲड्रेसबारवर टाईप करूनच वेबसाईट उघडावी.

- CREDIT CARD/ ATM-CUM-DEBIT CARD चा वापर विश्वासपात्र असलेल्या दुकानावरच करावा. आपल्या समोर क्रेडिट कार्ड स्वॅप करून परत घ्यावे. त्यावरील नंबर कोणीही नोंदवुन घेणार नाही अथवा त्याची झेरॉक्स काढणार नाही याची खात्री करावी.

- ATM-CUM-DEBIT CARD वर पिन नंबर लिहु नये. व्यवहार झाल्यानंतर परत कार्ड घेण्यास विसरू नये. तसचे CREDIT CARD/ ATM-CUM-DEBIT CARD हरविल्यानंतर त्वरीत संबंधीत बॅकेस कळवुन सदर कार्ड ब्लॉक करावे.

**या संबंधात काही अनुचित घडल्यास त्वरीत जवळच्या पोलीस स्टेशनला संपर्क साधुन तक्रार करावी अथवा सायबर क्राईम सेल, गुन्हेशाखा, नागपूर शहर येथील दुर.क्र.२५६६६४९,२५६६७६६ किंवा polcomnagpur@yahoo.co.in येथे संपर्क साधावा.**